आदिशक्तीचे रेणुका स्वरुपात पृथ्वीवर प्रकटन

देव व दानवांचे पूर्वी महाभयंकर युद्ध झाले. यामध्ये बलवान दैत्यांनी कपटाने देवांना जिंकले आणि पराभूत झालेल्या इंद्रादि देवांना हाकलून दिले. तेव्हा ते सर्व देव विष्णूला शरण गेले. सर्व देवांनी क्षीरसमुद्राजवळ जाऊन शेषाच्या शय्येवर असलेल्या विष्णूची मनोभावे आराधना केली आणि ह्या दुष्ट राक्षसांच्या त्रासातून समस्त देवगणांना मुक्त करण्याची विनंती केली. सर्व देवांनी भगवान विष्णूची स्तुती करुन भगवान विष्णूचे शौर्य वर्णन केले, 'हे भगवान! आपण मत्स्यादि दशावतार घेऊन संपूर्ण विश्वाचे रक्षण केले आहे. दैत्य आणि राक्षसांपासून सज्जनांचे, भक्तांचे रक्षण केले. तुम्ही सर्वांचे कल्याण करणारे परमेश्वर आहात. आज ह्या दुष्ट दैत्यांनी कपटाने आम्हास जिंकून स्वर्गातून आम्हास हाकलून दिले आहे. त्यांचा संहार कर आणि आम्हास संकट मुक्त कर.'

भगवान विष्णूंनी सर्व देवांची विवंचना समजून घेतली. त्यांना राक्षसांच्या अतिरेकातून मुक्त करण्याचे अभिवचन दिले. भगवान विष्णू म्हणाले, 'हे देवांनो ! मी अदितीच्या पोटी जन्म घेईन व तेव्हा मी सर्व दुष्ट दुर्जनांचा, दानवांचा नाश करीन आणि शस्त्रास्त्र धारण करुन देवांना, सज्जनांना, माझ्या भक्तांना छळणाऱ्या शस्त्रास्त्राने युक्त असलेल्या त्या दुष्ट दैत्यरुपी क्षत्रियांचा एकवीस वेळा संहार करून ही पृथ्वी निःक्षत्रिय करीन. त्यावेळी अदिती, एकवीरा ह्या नावाने प्रसिद्ध होणारी, सर्व कामना पूर्ण करणारी माझी आई रेणुका म्हणून ती पृथ्वीवर जन्म घेईन आणि मी तिच्या उदरी जन्म घेईन. माझी आराधना न करता आपण अदिती, एकवीरे चरणी जा. तिची प्रार्थना करा. ती मला धारण करणार असेल तर मी तिच्या पोटी जन्म घेईन.'

आनंदित होऊन सर्व देव अदितीकडे गेले. विनम्र होऊन सर्व देवांनी जगन्माता अदितीस नमस्कार केला व देवीला म्हणाले, 'हे माते ! तू सर्व इच्छा पूर्ण करणारी आहेस, आम्हास दैत्यांनी जिंकले आहे. त्यांचा तू संहार कर, श्री विष्णू तुझ्याच पोटी जन्म घेणार आहेत. त्यांना तू पोटात सुखाने धारण करुन तिन्ही जगाचे कल्याण कर, दुष्ट-दैत्यांचा वध केल्यानंतर तू खरोखरच एकवीरा होशील.'

आपल्या भक्तांवर आलेले संकट निवारण्यासाठी अदिती धावून आली. आपल्या भक्तांना कृपांकित करताना जो अतर्क्य, अप्रमेय, पद्मनाभ, असुरांचा नाश करणारा आहे, ज्याच्या उदरात हे सर्व ब्रह्मांड सामावले आहे, त्या विश्वाला धारण करण्यासाठी आदिशक्ती अदिती तत्पर झाली. घोर तपःश्चर्या करुन देव, गंधर्व, किन्नर, सिद्ध, विद्याधर सर्प, रुद्र आणि ऋषींचे तेज तिच्यात सामावले. कैलास पर्वतावर केलेल्या घोर तपःश्चर्येने ब्रह्मादी देव, ऋषी, मुनी, सिद्धचारण यांनी अदिती देवीला एकवीरा हे नाव दिले.

कैलास पर्वतावरील तप, साधनेमुळे भगवान शंकरदेखील अदितीला प्रसन्न होऊन म्हणाले, 'हे देवी ! देवदेखील जिला वंदन करतात, अशी तू माझ्याजवळ काय मागतेस? हे देवी ! मी प्रसन्न झालो आहे. तुझी इच्छा मी पूर्ण करीन.' तेव्हा अदिती भगवान शंकरास म्हणाली, 'हे भक्तवत्सला ! मला अयोनी जन्म दे आणि तू कश्यपाच्या कुळात जन्म घेऊन माझा पती हो. त्रिभूवनाच्या संरक्षणाकरीता व धर्माच्या संरक्षणाकरीता पुत्राची इच्छा करणारी मी जन्म घेईन. माझ्या पोटी त्रिभूवनाचा पती असा श्रीविष्णू जन्म घेईल व तो शस्त्रास्त्र धारण करुन उन्मत्त झालेल्या सर्व दुष्टांचा संहार करेल आणि ही पृथ्वी निःक्षत्रिय करुन लोकांना आनंद देईल.'

भगवान शंकरासोबतच अदितीने शंकराची प्रिय पत्नी पार्वतीचीही आराधना करुन पार्वतीस प्रसन्न करुन घेतले. भगवान शंकराने ही पार्वतीस प्रसन्न होऊन अदितीस 'वर' देण्यास सांगितले. पार्वती अदितीस प्रसन्न होऊन म्हणाली, 'सर्व लक्षणांनी युक्त, सर्व इच्छा पूर्ण करणारी माझ्या रुपाने तू उत्पन्न होशील, जिच्या केवळ दर्शनाने लोकांना इहलोकी भोग व परलोकी मोक्ष मिळेल, अशी तू पृथ्वीवर जन्म घेशील. हे पवित्र देवी ! तुला अग्निप्रमाणे तेजस्वी पुत्र होतील.' स्कंद पुराणाताली सह्याद्री खंडातील रेणूका महात्म्यातील पृथ्वीवर प्रकट होण्यापूर्वी अदिती, आदिशक्ती, एकवीरा म्हणजेच रेणुकेचे प्रकटनापूर्वीचे संयोजन श्रवण करणाऱ्या प्रत्येक भक्ताचे अंतःकरण शुद्ध होऊन तेजोमय झाल्याशिवाय राहत नाही. कारण पृथ्वीवर प्रकट होण्यापूर्वी आदिशक्ती रेणुकेने जे महन्मंगल स्वरुप, परम पावन तेज यासोबतच सर्वच दिव्य गुणांनी युक्त असे रुप धारण केले, ते एकमेवाद्वितीय असे आहे. आता हेच पाहा ना. भगवती रेणुकेने ज्याच्यामध्ये सर्वच ब्रह्मांड सामावलेले आहे, त्या भगवान श्रीविष्णुलासुद्धा आपल्या मातृत्वाच्या सामर्थ्याने उदरामध्ये धारण करण्याचा निर्णय घेतला, असे पावन मातृत्व धारण करण्यासाठी तिने घोर तपःश्चर्या केली. ह्याच ठिकाणी तिच्या मातृत्वाच्या व स्त्रीत्वाच्या तेजाने भक्त कृतकृतार्थ होतात. एवढेच नव्हे तर विश्वसंहारक उमापती भगवान शंकरास पती म्हणून कश्यपाच्या कुळात जन्म घेण्यास भाग पाडले व शंकराची प्रिय पत्नी पार्वतीलासुद्धा आपल्यामध्ये अंशरुपाने सामावून घेतले. भक्तरुपी वत्सलासाठी अदिती रेणुकेने ज्या काही योजना केल्या, त्या भक्तांच्या कल्याणासाठी पापमुक्त पृथ्वीसाठी यथायोग्य अश्याच आहेत.

अशा तऱ्हेने देवमाता अदितीने पृथ्वीवर प्रकट होण्याचा निर्णय घेतला. स्कंदमुनी देवमाता अदितीचे सुरेख मनोवेधक वर्णन करतात. जिचे माहात्म्य सांगण्यास ब्रह्मदेवदेखील असमर्थ आहेत, शंकरालाही जे जमले नाही, भगवान श्रीविष्णुलाही तिच्या पोटी जन्म घ्यावा लागतो, त्या अदिती म्हणजेच एकवीरेचा पती म्हणून ज्ञानगम्य परमपुरुष जन्मला,

पण त्या आधी रेणूकेचे पृथ्वीवरील जन्म आपण जाणूया. रेणुकेचा पृथ्ववरील जन्म खूपच परम, पावन चित्तवेधक आणि चित्त शुद्धिकारक आहे. अदितीचे पृथ्वीवरील प्रकटन स्मरण करताना भक्त आत्मभान हरवतो. एक निरागस बालक होऊन त्याची आत्मशुद्धी होते.

रेणुकेचा जन्म

अलौकिक, तेजःपुंज देव, सिद्ध, ऋषी यांचे निवास असलेल्या भागीरथीच्या तीरावर कान्यकुब्ज नावाची प्रसिद्ध नगरी होती. अशा परमपावन, वैभवसंपन्न कान्यकुब्ज नगरीचा इश्वाकू नावाचा सर्व शास्त्रात प्रवीण, धार्मिक व सत्यवादी राजा राज्य करीत होता. इक्ष्वाकू राजाला सद्‌गुणी, धार्मिक कार्यास श्रष्ठ असलेला एक मुलगा होता. त्याचे नाव रेणू असे होते. रेणू नावाचा राजा इक्ष्वाकू कुलास आनंद देणारा होता. तो सर्वगुणसंपन्न होता. होम, दानासह देव, ऋषी, मुनींसह सर्वांचे हित करणारा होता. तो दुष्टांचे दमन करण्यासाठी सज्ज व सज्जनांवर कृपा करणारा कृपाळू होता आणि पृथ्वीप्रमाणे क्षमाशील होता. रेणू राजा बुद्धीने बृहस्पतीसारखा व सूर्याप्रमाणे तेजस्वी होता. तो शास्त्रार्थात पारंगत होता आणि भगवान विष्णूचा परमभक्त होता. आपणास कन्यारत्न व्हावे म्हणून रेणू राजाने आपल्या भार्येसह तपश्चर्या केली. भगवान शंकराची व पार्वतीची आराधना केली. रेणू राजा व त्याच्या प्रिय पत्नीच्या परमभक्तीला पाहून शंकर-पार्वती रेणु राजास व त्याच्या पत्नीस प्रसन्न झाले. शंकर-पार्वती प्रसन्न होऊन रेणू राजास व त्याच्या पत्नीस इच्छित वर मागण्यास सांगितले. तेव्हा रेणू राजाने देवाधिदेव शंकरास अर्चना केली की, 'हे स्वामी ! मला सर्व लक्षणांनी युक्त, रुपसंपन्न, तेजःपूर्ण अशी एक कन्या दे व सर्व जगाचे कल्याण करणारा पुत्र दे.' तेव्हा भगवान शंकराने रेणू राजास वर दिला व म्हणाले, 'हे राजा ! सर्व तीर्थांपेक्षा अधिक पुण्यवान सर्व शास्त्रांना मान्य, मनुष्यांच्या सर्व कामना पूर्ण करणारी अशी सुलक्षणी कन्या तुला होईल. तसेच तुला शूरसेन नावाचा प्रसिद्ध मुलगा होईल.'

नंतर सूर्योदयी मोठा व मिळालेल्या रेणू राजाने महादेवाला नमस्कार केला व कन्याप्राप्तीसाठी यज्ञ केला. गंगा नदीच्या काठी सर्वच देवी-देवतांना आवडणारा असा यज्ञ सुरु केला. ह्या पावन यज्ञाचे ऐश्वर्यपूर्ण वर्णन स्कंदपुराणात स्कंदमुनींनी फारच हृदयानंदी केले आहे. गंगा तटी कन्या प्राप्तीसाठी असा कल्याणकारक यज्ञ सुरु असताना त्यामध्ये विद्वत्‌जनांना उदारहस्ते दक्षिणा व अन्नदान केले. तेथे देव, गंधर्व, सोमपान करणारे आणि कठीण व्रत धारण करणारे ऋषी आले. ह्या यज्ञात नाग, यक्ष, देव, ऋषी, अत्री, वसिष्ठ, गालव व जैमिनी हे सर्व आले. तसेच जाबली, गौतम, कौत्स, कौडिण्य, गार्ग्य, भारद्वाज, शतानंद व विद्वान पाराशर मुनी आले. ह्याच यज्ञात दाल्भ्य,

पुलस्त्या, शुनक, शौनक, नारद, असित, देवल, कण्व, विदर्भ, सहस्त्रपात, मार्कण्येय, शमिक आणि सर्वशास्त्र पारंगत असलेले व कठीण व्रत धारण करणारे बरेच मुनी तेथे आले. तसेच सर्वच राजर्षी त्या यज्ञात आले. तेथे श्रीषट् व आश्रावय हे ध्वनी वारंवार ऐकू येत होते. हा यज्ञ तिन्ही लोकांना सुख देणारा व पवित्र होता. ते यज्ञस्थान होमाच्या धुराने भरून गेले होते.

ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद वगैरे वेदांच्या मंत्रांनी ते यज्ञस्थान स्वर्गासारखे श्रेष्ठ झाले. परम वैभव प्राप्त करुन देणारा हा यज्ञ मंत्रोपचार, पूजाविधीने अलंकृत होत असताना सर्वच देव, ऋषी, मुनी, विद्वत्जनांच्या साक्षीने यज्ञकुंडातून प्रचंड तेज धारण केलेली अत्यंत रुपवती, दिव्य वस्त्र परिधान केलेली, चंदनाची उटी लावलेली, दिव्य अलंकार घातलेली, कल्याणमुखी, स्वर्गसुखापेक्षाही अत्यानंद देणारी स्त्री प्रकटली. ह्या सुमुखी यज्ञकन्येने रत्नकुंडल धारण केली होती. तिचे डोळे लक्ष्मीप्रमाणे दीर्घ होते आणि ती गंगा-पार्वतीप्रमाणे अत्यंत रुपवती व तेजस्वी होती. तो महान यज्ञ सुरु असताना यज्ञकुंडातून चंद्रबिंबाप्रमाणे अदिती एकदम बाहेर आली. त्या सर्वांग सुंदरीला पाहून यज्ञात स्तवन करणाऱ्या ऋषी, देव व चारणांनी पुष्पवृष्टी केली. त्यावेळी देवांच्या दुंदुभी, मृदंग व पणवादी वाद्यांचा गजर झाला. ती देवी जन्म झाल्याबरोबर वीणा व वेणूचा मंजूळ नाद निनादत होता.

तेव्हा आनंदित देव, ऋषी, मुनी, गंधर्व यांना वंद्य असलेली ती एकवीरा, अदिती, गंगागौरी, लज्जागौरी आहे अशी आकाशवाणी झाली. त्या दिव्य कन्येस विनर्म अभिवादन करुन, तिचे मनोभावे स्वागत करुन अर्चना केली व नंतर सर्वच ऋषी, मुनी, देवजनांना व विद्वत्जनांना यथाशक्ती रत्न, उंची वस्त्रे देऊन रेणू राजाने संतुष्ट केले.

सर्व लक्षणांनी युक्त अशी अयोनिसंभव, यज्ञकुंडातून निघालेली अदिती, एकवीरा किंवा आदिशक्तीने पितृत्व प्राप्त झालेल्या रेणू राजाच्या नावावरून 'रेणुका' हे नाव धारण केले व आपल्या परमभक्तास पितृत्वाचा सन्मान देऊन रेणू राजास कृतार्थ केले. विश्वातील इतर कोणतीच शक्ती तिच्या प्रभावाचे वर्णन करु शकत नाही. जिच्या दर्शनाने व जिचे महात्म्य शुद्ध अंतःकरणाने श्रवण केल्याने स्त्री-पुरुष पापरहित होतात व त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. अशा रेणुकेचा प्रभाव वर्णन करण्यास चतुरानन ब्रह्मदेव व पंचानन महादेवही असमर्थ आहेत. त्या यज्ञानंतर तेथे जमलेल्या सर्वच विद्वत्जनांनी रेणूकेला भक्तिभावाने नमस्कार करुन आनंदाने आपआपल्या स्थानाप्रत प्रस्थान केले.

असे रेणुका जन्माचे ऐश्वर्यसंपन्न वर्णन रेणुका माहात्म्यातील चौथ्या अध्यायात वर्णिले आहे. जगन्माता रेणुका अशी पृथ्वीवरील रेणू राजाच्या शुभगृही प्रकटली आणि

देववाणीप्रमाणे ठरलेल्या विविध घटना घडत गेल्या. जगदीश्वर भगवान शंकर यांनीसुद्धा अदितीला दिलेल्या वराप्रमाणे कश्यप कुळात जन्म घेतला. रेणुकापती जमदग्नीची जन्मकथासुद्धा तितकीच श्रवणीय आहे.

जमदग्नीचा जन्म

ब्रह्मदेवांचा अत्यंत तपस्वी असा भृगु नावाचा पुत्र होता त्यास पौलोमीपासून चव्यन-भार्गव नावाचा पुत्र झाला. त्याचे नाव च्यवन भार्गव का पडले ? तर ह्याच भृगुऋषीने अग्नीस सर्वभक्षक हो, असा शाप दिला व ह्याच भृगुने अग्नीस पापनाशक व पवित्र केले. त्याचे कारण असे की, भृगुच्या अत्यंत आवडत्या आणि सुंदर पत्नीला तालजंघ नावाच्या भयंकर राक्षसाने पाहिले. तिच्या अभिलाषेने तालजंघ राक्षसाने अग्नीला तिच्याबद्दल विचारले, तेव्हा त्या अग्नीने सत्यव्रताचा भंग होवू नये म्हणून ही पौलोमी भृगुची भार्या आहे, असे खरे सांगितले. त्यासोबतच हे सुद्धा सांगितले की, पौलोमी ही श्रेष्ठ स्त्री महान पतिव्रता असून पतिभक्तिपरायण आहे. भृगुऋषी गंगेवर स्नान-संध्या, जपकर्मादि कर्म करण्याकरीता गेले आहेत. ते आता क्षणार्धात ह्या आश्रमात परत येतील.' अग्नीचे हे बोलणे ऐकून पौलोमीला उचलून तो राक्षस आकाशमार्गे निघाला असता त्या तालजंघ राक्षसाचे भयंकर रुप पाहून पौलोमी घाबरून गेली व त्या क्षणीच तिचा गर्भ खाली पडला. जन्मल्याबरोबर त्या बालकाने शत्रूला ठार केले. मुनिश्रेष्ठ भृगु गंगेवरुन स्नान करुन, जपादिकर्मे करुन आपल्या आश्रमात आले तेव्हा आपल्या पत्नीला जमिनीवर पडलेली पाहून भस्मराशी जवळ रडत असलेल्या मुलाला पाहून त्यांनी त्या अनिष्ट प्रकाराबद्दल अग्नीला विचारणा केली. 'हे गार्दपत्य अग्ने ! तू येथे असताना असा कोण बलिष्ठ आहे की ज्याने आश्रमात प्रवेश केला ? त्वरीत सांग, नाहीतर मी तुला शाप देईल. जेव्हा अग्नीने घडलेला सर्व सत्य वृत्तांत सांगितला. अग्नीचे हे बोलणे ऐकून क्रोधमूर्छित भृगुने तू सर्वभक्षक होशील, असा शाप दिला. पण तेव्हा ब्रह्मादिदेवांनी आणि तत्त्व जाणणाऱ्या मुनींनी भृगुची प्रार्थना केल्यावरुन भृगुने अग्नीला पुन्हा शुद्ध केले व भृगुने आपल्या कमंडलूतील पाणी जमिनीवर शिंपडून आपल्या भार्येला उठविले व आपल्या पुत्राला उचलून घेतले. याप्रमाणे आईच्या उदरातून च्यूत झाला म्हणून भृगु व पौलोमीच्या पुत्रास च्यवन भार्गव हे नाव पडले व ह्या च्यवन भार्गवास ब्रह्मदेवाच्या कृपेने ब्रह्मदेवाचा अवतार असलेला रुचिक नावाचा पुत्र झाला. ह्या रुचिकाचा संबंध वसु ह्या प्रसिद्ध पृथ्वीपती राजा व त्याच्या वंशावळीशी येतो तो असा. वसुला महादेवाच्या कृपेने भीम नावाचा मुलगा झाला. त्या भीमाचा श्रीमान कांचन हा मुलगा व ह्या श्रीमान कांचनला सुहोत्र नावाचा मुलगा होतो व ह्या सुहोत्राला केशिनीपासून जन्हू नावाचा पुत्र झाला.

जेव्हा मुनींसह तीव्र तपःश्चर्या करत असलेल्या जन्हूला भगीरथ राजाने आपल्या पितरांना पापापासून मुक्त करण्यासाठी आणलेल्या गंगेने आलिंगन दिल्याने व गंगेने पुढे होणारी गोष्ट लक्षात आणून यज्ञकर्म चालू असता ते ठिकाण पाण्याने बुडविले. यज्ञस्थान गंगेने बुडविल्याचे पाहून सौहोत्री राजा संतप्त झाला.

तपश्चर्येत मग्न जन्हूने क्रोधात गंगेस पिऊन टाकले. हे पाहून महर्षींनी त्या श्रेष्ठ गंगेला जन्हूची मुलगी जान्हवी म्हणून पुन्हा वर आणविले. अशा ह्या जन्हूला आपली पत्नी कावेरीपासून सुहोत्र झाला आणि ह्या सुहोत्रला सहयक नावाचा मुलगा झाला. सह्यकाला बलाकाश्व हा महातपस्वी पुत्र व बलाकाश्वला कुश नावाचा शिकारीचा नाद असलेला समर्थ पुत्र होता. कुशाला देवाप्रमाणे चार पुत्र झाले. त्यांची नावे कुशोब, कुशनाभ, भृंग, समनावस् अशी होती.

अशा राजश्रेष्ठ कुशांबाने पुत्रप्राप्तीकरीता तपश्चर्या करुन इंद्रास प्रसन्न करुन घेतले व इंद्राने स्वतः कुशांबाच्या शुभगृही गाधी नावाने पुत्ररुपाने जन्म घेतला. ह्या महात्म्या गाधीची पौरुकुत्सा नावाची भार्या होती व ह्या उभयतांना सत्यवती नावाची एक भाग्यवती कन्या झाली. तिला गाधीने भृगू ऋषीचा नातू म्हणजेच च्यवन भार्गवाचा पुत्र रुचिक यास दिली. तिच्यावरील प्रेमाने भृगूकुलाला आनंद देणाऱ्या रुचिकाने स्वतः पुत्र प्राप्तीकरीता व आपला सासरा गाधीलाही पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून चर केला. रुचिकाने आपल्या प्रिय पत्नी सत्यवतीस बोलावून, हा चर तू आणि तुझ्या आईने खावा असे सांगितले. ह्या एका चरुमुळे तुझ्या आईस म्हणजे पौरुकुत्सास अत्यंत तेजस्वी व क्षत्रिय श्रेष्ठ असा पुत्र होईल. तो सर्व क्षत्रियांना अजिंक्य राहील व असंख्य क्षत्रिय समूहाचा तो नाश करील. स्वतःची पत्नी सत्यवतीस देखील ह्या दुसऱ्या चरुमुळे अत्यंत शांत, बुद्धिमान व तपस्वी असा पुत्र होईल असे आशीर्वचन दिले व असे सांगून रुचिक तपश्चर्येकरीता गोदावरीकाठी मार्गस्थ झाला.

कालांतराने गाधी राजा आपल्या पत्नीसह तीर्थयात्रेच्या निमित्ताने रुचिकाच्या आश्रमात आला. आपल्या आई-वडिलांना पाहून रुचिक पत्नी सत्यवती आनंदित झाली व तिने आपल्या पतीने दिलेले दोन्ही चरु आपल्या आईला दाखविले व ह्या दोन्ही चरुविषयी माहात्म्य सांगून आपल्या पतीने काय सांगितले हे ही सांगितले. पण दैवयोगाने सत्यवतीच्या आईने म्हणजे पौरुकुत्साने सत्यवतीकरीता असलेला चरु स्वतः ठेवून घेतला व स्वतःकरीता असलेला चरु सत्यवतीला दिला. अशा तऱ्हेने पौरुकुत्सा व सत्यवतीमध्ये चरुची अदलाबदल झाली व ह्या चरुच्या ग्रहणामुळे सत्यवतीला अत्यंत भयंकर, तेजस्वी व क्षत्रियांचा नाश करणारा गर्भ राहिला. रुचिकाने हे आपल्या योगदृष्टीने पाहिले व

जेव्हा मुनींसह तीव्र तपःश्चर्या करत असलेल्या जन्हूला भगीरथ राजाने आपल्या पितरांना पापापासून मुक्त करण्यासाठी आणलेल्या गंगेने आलिंगन दिल्याने व गंगेने पुढे होणारी गोष्ट लक्षात आणून यज्ञकर्म चालू असता ते ठिकाण पाण्याने बुडविले. यज्ञस्थान गंगेने बुडविल्याचे पाहून सौहोत्री राजा संतप्त झाला.

तपश्चर्येत मग्न जन्हूने क्रोधात गंगेस पिऊन टाकले. हे पाहून महर्षींनी त्या श्रेष्ठ गंगेला जन्हूची मुलगी जान्हवी म्हणून पुन्हा वर आणविले. अशा ह्या जन्हूला आपली पत्नी कावेरीपासून सुहोत्र झाला आणि ह्या सुहोत्रला सहयक नावाचा मुलगा झाला. सह्यकाला बलाकाश्व हा महातपस्वी पुत्र व बलाकाश्वला कुश नावाचा शिकारीचा नाद असलेला समर्थ पुत्र होता. कुशाला देवाप्रमाणे चार पुत्र झाले. त्यांची नावे कुशोब, कुशनाभ, भृंग, समनावस् अशी होती.

अशा राजश्रेष्ठ कुशांबाने पुत्रप्राप्तीकरीता तपश्चर्या करुन इंद्रास प्रसन्न करुन घेतले व इंद्राने स्वतः कुशांबाच्या शुभगृही गाधी नावाने पुत्ररुपाने जन्म घेतला. ह्या महात्म्या गाधीची पौरुकुत्सा नावाची भार्या होती व ह्या उभयतांना सत्यवती नावाची एक भाग्यवती कन्या झाली. तिला गाधीने भृगू ऋषीचा नातू म्हणज़ेच च्यवन भार्गवाचा पुत्र रुचिक यास दिली. तिच्यावरील प्रेमाने भृगूकुलाला आनंद देणाऱ्या रुचिकाने स्वतः पुत्र प्राप्तीकरीता व आपला सासरा गाधीलाही पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून चर केला. रुचिकाने आपल्या प्रिय पत्नी सत्यवतीस बोलावून, हा चर तू आणि तुझ्या आईने खावा असे सांगितले. ह्या एका चरुमुळे तुझ्या आईस म्हणजे पौरुकुत्सास अत्यंत तेजस्वी व क्षत्रिय श्रेष्ठ असा पुत्र होईल. तो सर्व क्षत्रियांना अजिंक्य राहील व असंख्य क्षत्रिय समूहाचा तो नाश करील. स्वतःची पत्नी सत्यवतीस देखील ह्या दुसऱ्या चरुमुळे अत्यंत शांत, बुद्धिमान व तपस्वी असा पुत्र होईल असे आशीर्वचन दिले व असे सांगून रुचिक तपश्चर्येकरीता गोदावरीकाठी मार्गस्थ झाला.

कालांतराने गाधी राजा आपल्या पत्नीसह तीर्थयात्रेच्या निमित्ताने रुचिकाच्या आश्रमात आला. आपल्या आई-वडिलांना पाहून रुचिक पत्नी सत्यवती आनंदित झाली व तिने आपल्या प्रतीने दिलेले दोन्ही चरु आपल्या आईला दाखविले व ह्या दोन्ही चरुविषयी माहात्म्य सांगून आपल्या पतीने काय सांगितले हे ही सांगितले. पण दैवयोगाने सत्यवतीच्या आईने म्हणजे पौरुकुत्साने सत्यवतीकरीता असलेला चरु स्वतः ठेवून घेतला व स्वतःकरीता असलेला चरु सत्यवतीला दिला. अशा तऱ्हेने पौरुकुत्सा व सत्यवतीमध्ये चरुची अदलाबदल झाली व ह्या चरुच्या ग्रहणामुळे सत्यवतीला अत्यंत भयंकर, तेजस्वी व क्षत्रियांचा नाश करणारा गर्भ राहिला. रुचिकाने हे आपल्या योगदृष्टीने पाहिले व

तेव्हा आपल्या पत्नीला म्हणाला, 'चरुची अदलाबदल करुन तुझ्या आईने तुला फसविले आहे. त्यामुळे तुला अत्यंत क्रूरकर्म करणारा व भयंकर पुत्र होईल व तुझी आई वेदाध्यान करणारा, तपोधान शमप्रधान, जो तपाने मी तुला समर्पण केला होता, अशा पुत्रास जन्म देईल.' हे ऐकताच सत्यवतीने आपल्या प्रिय पतीची विनवणी केली व अर्चना केली की, 'आपल्या इच्छेप्रमाणेच मला तुमच्यापासून शांत, क्षमाशील व सरळ मनाचा पुत्र व्हावा म्हणून विनविले.' आपल्या प्रिय पत्नीची इच्छा पूर्ण करण्याकरीता आपल्या तपोबलाने सत्यवतीच्या पोटी तपःश्चर्येत निमग्न असलेला, इंद्रियाने दमन करणारा, शांत वृत्तीचा जमदग्नी नावाचा पुत्र उत्पन्न केला तर रुद्र आणि विष्णू यांच्या चरुंच्या अदलाबदलामुळे ब्रह्मर्षी समता प्राप्त झालेला, तपस्वी, बुद्धिमान असा पौरुकुत्साला विश्वामित्र नावाचा मुलगा झाला.

श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज विरचित श्रीदत्त पुराणामध्ये हे चरु भृगूऋषीने पौरुकुत्सा व सत्यवतीस दिल्याचा उल्लेख आहे. अशा तऱ्हेने गाधी व पोरुकुत्साचा मुलगा ब्रह्मषी विश्वामित्र, तर रुचिक आणि सत्यवतीचा पुत्र महातेजस्वी जमदग्नी नावाचा पुत्र झाला. अशी पुण्यवती सत्यधर्माचे आचरण करणारी सत्यवती स्वेच्छेने सर्व पापांना नाश करणारी कौशिकी नाव धारण करुन नदीच्या रुपाने वाहू लागली.

रेणुकेचे स्वयंवर

रुचिक ऋषीने आपला पुत्र जमदग्नीसह गौतमी नदीच्या कोटी तीर्थावर तीव्र तपश्चर्या केली. नंतर दीर्घकालापर्यंत प्रतापवान जमदग्नीने आई, पिता, गंगा, मुनी आणि देव यांची आराधना केली. ऋषी परिवृत्त अशा त्या महातेजस्वी जमदग्नीने वायुभक्षण आणि इन्द्रिय दमन करुन तीव्र तप केले. असे खडतर तप करुन महातेजस्वी जमदग्नी शुभकाळी आपल्या पित्यासह गोदावरी तटावरून भगीरथीच्या दर्शनास गेले. त्यावेळी रेणू राजास हे दोन्ही ऋषी दिसले. दोन तेजस्वी अत्यंत सुंदर ऋषी पाहून रेणू राजाने मोठ्या आदराने त्यांचे स्वागत केले. त्यांचे आदरातिथ्य करुन रेणु राजाने त्या दोन ऋषींना विचारले, 'जगाला मोहून टाकणारे रुप धारण करणारे आपण कोण आहात ?' तेव्हा जमदग्नीने उत्तर दिले, 'हे राजर्षे ! आम्ही भृगूकुलोत्पन्न असून हे रुचिक ऋषी असून माझे पिता आहेत. आम्ही गोदावरी तटावरून तुझ्या भेटीसाठी येथे आलो आहोत.' उभयतांची ओळख झाल्यावर रेणू राजा म्हणाला, 'हे ऋषिवर मी आपल्या दर्शनाने धन्य झालो आहे. आपली माझ्यावर फार कृपा झाली. माझी मुलगी सर्व जगात अप्रतिम व सुंदर आहे. ती सर्व सुलक्षणी आणि सर्वगुणसंपन्न आहे. ती कोणास द्यावी, हे मला खरोखरच सुचत नव्हते.' रेणू राजाची तसदी ऐकून रुचिक ऋषी म्हणाले, 'हे राजा, ही तुझी कन्या

रुपवती व गुणवती अशीच आहे. हिचे स्वयंवर करावे.' रुचिक ऋषीचे म्हणणे ऐकून रेणू राजाने विनंती केली की, 'आपण आपल्या जमदग्नी पुत्रास घेऊन स्वयंवरास निश्चित यावे.' रेणू राजाचे आदरातिथ्य स्वीकारून रुचिक व जमदग्नी आपल्या स्थानाकडे परतले.

नंतर रेणू राजाने भागीरथीच्या तीरावर कन्या रेणुकेचे स्वयंवर आरंभिले. स्कंदमुनींनी ह्या स्वयंवराचे अप्रतिम वर्णन स्कंदपुराणात वर्णिले आहे. पताकांनी सजविलेला दिव्य असा विवाह मंडप तयार केला. तसेच सुवासिक व रुचकर पक्वान्ने तयार केली आणि तेथे रत्नजडित अशी प्रशस्त आसने मांडली होती. सुंदर गालीचे टाकलेले निरनिराळ्या आकाराचे झोपाळे टांगलेले होते. सुंदर-सुंदर चित्रांनी विवाह मंडप शोभायमान दिसत होता. तेथे जेव्हा रेणू राजाने मोठ्या विनम्रतेने असे सांगितले की, माझ्या रेणुका ह्या दिव्य कन्येकरीता पती म्हणून अनुरूप होणारा त्रिभुवनात असा कोणीही नाही. तेव्हा आता मी काय करावे ? उपस्थित सर्व ऋषी-मुनींनी तेव्हा रेणू राजास सांगितले की, 'तुझ्या दिव्य कन्येस जो राजा अथवा ऋषी अनुरुप वाटत असेल, त्याचे सोबत सन्मानपूर्वक रेणूकेचा विवाह करुन दे.' सर्वच ऋषी-मुनींनी असे सांगितल्यावर रेणूकेला जमदग्नीस देण्यासाठी रेणू राजाने रुचिक व जमदग्नीचे स्मरण केले. रेणू राजाने स्मरण केल्याबरोबर रुचिक व जमदग्नी सत्वर स्वयंवरास उपस्थित राहिले. तेव्हा त्या उभयतां ऋषींना वंदन करुन व यथोचित सत्कार करुन रेणू राजाने आपल्यी कन्या रेणुकेस पाचारण केले व रेणुकेस रेणू राजा म्हणाला, 'हे कल्याणी ! या राजपुत्रातून अथवा मुनीतून रुपलक्षणांनी युक्त असा तुला आवडेल तो पती निवड.' पित्याचे आवाहन ऐकून दिव्य अलंकार धारण केलेल्या रेणुकेने जमदग्नीखेरीज सर्व लोकांकडे पाहिले. रेणुकेने वडिलांना पित्यासमान, धाकट्यांना पुत्रासमान, समवयस्कांना भावाप्रमाणे पाहिले. अशा रीतीने सर्व राजे व ऋषींनी वगळून पित्याने अनुमती दिल्यावर एकवीरा रेणुकेने जमदग्नी ऋषीस आपल्या इच्छेने वरले व आदराने रत्नपुष्पांची माला जमदग्नीच्या गळ्यात घालली. तेव्हा मृदंग, भेरी, पणव आदि वाद्यांचा मोठा गजर झाला. आकाशातून पुष्पवृष्टी झाली. गंधर्व गाऊ लागले, अप्सरा नाचू लागल्या आणि सर्व जगाला सुखकारक असे वीणा, वेणू आणि मुनींचे ध्वनी निघाले.

रेणू राजाने जमदग्नी व रेणुकेस स्वयंवरात पुष्कळ आंदण दिले. ज्यामध्ये सुवर्णांकित असलेल्या पुष्कळ दूध देणाऱ्या गाई, एकसारखे शामकर्ण असलेले आयुत घोडे आणि निकोप सुंदर परिचर्या करण्यात कुशल असलेल्या हजार तरुण स्त्रिया तसेच रत्ने, वस्त्रालंकार. यासोबतच जेव्हा रुचिक आपल्या जमदग्नी व सून रेणुकेस घेऊन आपल्या स्थानी परत निघाला, तेव्हा कान्यकुब्ज या सुंदर नगरीचे राज्य एकवीरा रेणुकेस वस्त्रालंकार म्हणून देऊन सत्कार केला आणि जेव्हा रुचिक, जमदग्नी व रेणुका आपल्या नगरीत

आले, तेव्हा इंद्र स्वतः देवासहित रेणुकेचा सत्कार करण्यासाठी तेथे आला. तेव्हा इंद्राने जमदग्नी व रेणुकेस कामधेनू आणि कल्पतरु प्रदान केले. तसेच दिव्य चिंतामणी, परीस व सिद्धपादुका दिल्यानंतर मोठ्या आनंदाने भागीरथी तीरावरील महोदया नावाच्या नगरीत मुनीसहीत आपल्या पत्नी रेणुकेसह जमदग्नी राहू लागले.

आतापर्यंत आपण आदिशक्ती रेणुकेचे पृथ्वीवरील अवतरण, जमदग्नीचा जन्म व तद्नंतर जमदग्नी-रेणुकेच्या विवाहाचे सुरेल कथन ग्रहण केले. विधी नियमानुसार दुष्टांच्या नाशाकरिता व सज्जनांच्या संरक्षणाकरीता जे संयोजन आदिशक्तीने केले, ते घडत आले आहे. संयोजन सुनियोजित घडत असताना अनेक परम पावन घटनाही घडत गेल्या हा आदिशक्तीच्या तेजाचा साक्षात्कार आहे. आदिशक्ती ही शक्तीदायिनी व प्रेरणादायिनी आहे. तिच्या प्रत्यक्ष शक्तीनेच अग्नीस पावन केले, जमदग्नीसोबतच, विश्वाचा मित्र म्हणून गणल्या गेलेला महान तपस्वी ब्रह्मर्षी विश्वामित्राचाही जन्म झाला. रेणू राजाचाही उद्धार झाला, तसेच अनेक राजे, मुनी, तपस्वी यांनाही एकवीरा रेणूकेने कृतकृतार्थ केले. एक कन्यास्वरुपीनी होऊन रेणू राजास पावन केले, तर रुचिक ऋषीची सून होऊन आणि जमदग्नीची भार्या होऊन प्रत्यक्ष रुद्ररुपी महादेवांस कृपांकित केले. जमदग्नीची पत्नी होऊन जेव्हा रेणुकेने आपल्या पतीच्या आश्रमी पाऊल ठेवले तेव्हा तो आश्रमसुद्धा परम पावन होऊन ऐश्वर्यसंपन्न झाला. आतापर्यंत स्वर्गलोकी वास करीत असलेले कामधेनू, कल्पतरु, दिव्य चिंतामणी, परीस व सिद्धपादुका रेणुकेच्या महातेजाने प्रत्यक्ष इंद्राने स्वर्गातून आणून जमदग्नी रेणूकेच्या आश्रमी स्थानापन्न केल्या. आपण श्रवण केलेल्या रेणुकेच्या कन्या रुपाचे व पत्नीरुपाचे माहात्म्य प्रत्येक भक्तास नैतिक अधिष्ठान देणारे, आत्मतेज देणारे व मार्गदर्शन करणारे असेच आहे. अनादि काळापासून स्त्री ही शक्तिरुपिणी गणल्या गेलेली आहे. ह्या शक्तीला सर्वच आतापर्यंत नतमस्तक झालेले आहेत. जेव्हा जेव्हा या स्त्रीशक्तीवर दुष्टवृत्तींनी आक्रमण केले तेव्हा त्यांचा सर्वनाश झालेला आहे. कारण दुष्टांच्या संहाराकरिताच ह्या परम दिव्य शक्तीचा जन्म झालेला आहे हे आतापर्यंतच्या कथनावरुन पुन्हा सिद्ध होते.

जगन्माता रेणुकेचे पृथ्वीवरील जन्माचे जेव्हापासून संयोजन झाले तेव्हापासून भगवान शंकर जमदग्नीच्या रुपाने पृथ्वीवर अवतरले. भृगु ऋषींची पत्नी पौलोमीला तालजंघ राक्षसाने दुष्ट हेतूने अपमानित करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ह्या शक्ती तेजाने त्याचाही नाश केला. गंगेला जन्हूची मुलगी जान्हवी म्हणून पावन केले. जमदग्नीची माता सत्यवतीचे पुण्यकर्म पाहून पापनाशिनी असणाऱ्या कौशिकी नदीचे रुप देऊन जगत्वंद्य केले, अशा कितीतरी अलौकिक, कृपावंत घटना अदिती रेणुकेच्या आतापर्यंतच्या कथनात घडत गेल्याचे आपणास जाणवते.

अशा तऱ्हेने रेणुका जन्म व रेणुका विवाहानंतर विश्वव्यापिनी रेणुका कृपेने होणाऱ्या पुढील विविध घटना ही पुण्यप्रद तसेच श्रवणाने पापरहीत करणाऱ्या आहेत. आदिशक्तीच्या विविध रुपांचा साक्षात्कार वारंवार होत राहतो व आपण रेणुकेचे माहात्म्य वाचन व श्रवण करीत असताना क्षणोक्षणी स्वर्गसुखाचा लाभ घेत असतो. ह्या दिव्य मार्गदर्शक तेजाने जीवन सफल होत राहते. जमदग्नी आश्रमामध्ये पतीसेवेत लीन राहत त्रैलोक्याला आदरातिथ्याने तृप्त करुन रेणुका जमदग्नीचा गृहधर्म चालवीत असे. कालांतराने जमदग्नीला रेणूकेपासून अग्नी, इंद्र, सूर्य, वायू आणि विष्णूस्वरुप पाच पुत्र झाले. पहिल्या चार पुत्रांची नावे अशी - अग्नीरुप वसू झाला, वायूरुप विश्वासू, सूर्यरुप बृहद्भानू आणि इंद्ररुप बृहत्कण्व असे चार तेजस्वी पुत्र झाले.

परशुराम जन्म

विष्णूरुप परशुरामाची जन्माची कथा रंजक आणि चित्तवर्धक आहे. आई-वडिलांची आज्ञा पालन करीत वसु, विश्वासू, बृहद्भानु आणि बृहत्कण्व हे चार पुत्र आश्रमामध्ये विद्वत्जन व अग्निहोत्रींची सेवा मोठ्या श्रद्धेने करीत असायचे. एके दिवशी रेणुका आश्रमामधील कल्पवृक्षाजवळ बसली असता, भगवान विष्णूचा संदेश घेऊन देवमुनी नारद तेथे आले. रेणुकामातेस प्रणाम करुन भगवान विष्णूचा संदेश कळविला की, 'जगाच्या कल्याणासाठी मी तुझ्या गर्भात येणार आहे. पूर्वी वामन रुपाने अत्यंत लहान रुप धारण करुन मी तुझ्या गर्भात राहिलो आहे. यावेळी तू माझे केवढे रुप धारण करशील ? तू जेवढे रुप धारण करण्यास समर्थ असशील, तेवढ्या रुपाने मी तुझ्या गर्भात येईल.' नारदाच्या तोंडून भगवान विष्णूचा संदेश ऐकून जगत्धारण करणारी रेणुका नारदाला म्हणाली, 'ज्ञानीश्रेष्ठ नारदा ! आपण सर्व जाणता. मुले आईला विचारुन का कोठे गर्भात येतात? अशा प्रकारचे हे ज्ञानीश्रेष्ठ नारदा तू कधी ऐकले आहेस काय ? आज जसा तू मला विष्णूचा निरोप सांगितला तसा मी अथवा दुसऱ्या कोणत्याही स्त्रीने असे कधी ऐकले नाही. आता नारदा, भगवान विष्णूंनाही माझा एक निरोप सांग की, तुझी जेवढी मोठी शक्ती असेल त्या सर्व शक्तीने माझ्या उदरात प्रेरेश कर. हे बलवान विष्णो तू माझा पुत्र हो. ही तुझी आई तुझ्या कितीही भव्य दिव्य रुपास आपल्या उदरामध्ये सांभाळण्यास समर्थ आहे.'

या ठिकाणी रेणुकेच्या मातृशक्तीचे तेज प्रकट होते. पुन्हा एकदा स्त्रित्वाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. देवीसुक्तामध्ये अनुष्टुप छंदामध्ये सुंदर वचन येते ते असे,

या देवी सर्वभूतेषू मातृरुपेण संस्थिता
नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नमः

याचा अर्थ असा की, ज्या जननीमुळे या विश्वाने दर्शन बालकाला घडते, जिने अमृतमय दूध पोषण करते. इतकेच नव्हे तर मातृवात्सल्याला प्रत्यक्ष भगवान विष्णूही वंचित झाले होते, ते मातृस्वरुप तुझ्यामुळे त्यांना मिळाले. तुझ्या मातृशक्तीला त्रिवार वंदन.

धर्माचे रक्षण करण्यासाठी जगत्माता एकवीरा रेणुका एकटीच त्याला धारण करण्यास समर्थ आहे, असे सत्य जाणून स्वयं विष्णूने रेणुकेच्या पुण्य उदरात प्रवेश केला. भगवान विष्णुरुप आईच्या गर्भात तिच्या कुशीत एका कोपऱ्यात हळूहळू वाढत होता आणि ती कमललोचना रेणूका त्याला आपल्या उदरात धारण करीत होती.

यथावकाश दशदिशात मांगल्य पसरले असताना, निशा उजळली असताना अदिती नक्षत्रावर वैशाख महिन्याच्या तृतीयेला रात्रीच्या प्रथम प्रहरी सहा ग्रह उच्चीचे असताना चंद्र, राहू संगत मिथुनेचा असताना त्या राम नाव धारण करणाऱ्या भगवान विष्णूने रेणुकेच्या उदरातून जन्म घेतला, तेव्हा देवांच्या नगारे, मृदंग, पणव आदि वाद्यांचा गजर झाला. शंख, वीणा, वेणू इत्यादि मंगलवाद्ये वाजू लागली आणि त्याचवेळेस सहस्रार्जुनासह सर्वच अत्याचारी क्षत्रिय राजे थरथर कापू लागले. कालांतराने बलवान परशुराम आपल्या लीलेने आई-वडिलांना आनंद देऊन तो चंद्रकलेप्रमाणे वाढत होता. माता-पित्याच्या कृपेने सर्वगुणसंपन्न असलेला परशुराम शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे वाढू लागला. वडील जमदग्नीसोबत वेदशास्त्राचे अध्ययन करुन वडिलांसोबतच गुरुची सेवा केल्याशिवाय कल्याण होणार नाही, हे जाणून आई रेणुकेस म्हणाला, 'हे माते ! तू आज्ञा दिली तर मी तप करण्याकरीता पर्वतोत्तम कैलास पर्वतावर जातो. तेथे भगवान शंकराची आराधना करुन त्यांना प्रसन्न करुन घेईन व त्यांच्याकडूनच धनुर्विद्येचे ज्ञान घेईल. परशुरामाची गुरुची सेवा ज्ञानार्जनाची इच्छा जाणून जमदग्नीची संमती घेवून रेणुकेने त्यास कैलास पर्वतावर तप व ज्ञानार्जनाकरीता पाठविले.

परशुरामाने घोर तपश्चर्येने आणि निस्सीम श्रद्धेने भगवान शंकरास प्रसन्न करुन घेतले व भगवान शंकराकडून सरहस्य व ससंकल्प धनुर्विद्या शीघ्र प्राप्त करुन घेतली. भगवान शंकरानेही आपल्या प्रिय शिष्यास आपल्या पिनाक नावाच्या दिव्य धनुष्याने धनुर्विद्या शिकविली व पशुपतादिशस्त्रे प्रेमाने परशुरामास दिली. भगवान शंकरासारख्या श्रेष्ठ गुरुकडून धनुर्विद्या आदि प्राप्त करुन भगवान शंकराच्या परवानगीने परशुराम पुन्हा आपल्या आई-वडिलांकडे परतला. धनुर्धारी परशुरामाने आपल्या आई-वडिलांना भेटून त्यांचे दर्शन घेऊन पुन्हा त्यांच्या परवानगीने परशुविद्येकरीता विघ्नहर्त्या गणपतीची कैलासात आराधना केली व गणपतीला प्रसन्न करुन त्या विघ्नहर्त्याकडून परशुविद्यासुद्धा ग्रहण केली व पुढे परशुविद्येमध्येही निपूण झाल्यामुळे तो खऱ्या अर्थाने परशुराम झाला. नंतर विश्व कल्याणाकरीता परशुराम कैलासावर तपाचरण करीत वास करु लागला.

पितृआज्ञेने परशुरामाकरवी रेणुकेचा शिरच्छेद

बराच काळ लोटल्यानंतर आश्रमात पती जमदग्नीसोबत रेणूका पती भक्तीसेवेत रत राहून आश्रमात येणाऱ्या सर्वच ऋषी, मुनी, देव, राजे यांचे यथायोग्य आदरातिथ्य करु लागली. एके दिवशी माता रेणुका रजस्वला झाली. तीन दिवसानंतर चौथ्या दिवशी सूर्योदय होताच गंगेवर स्नानासाठी गेली. गंगेत स्नान करुन तेथे स्नानास आलेल्या स्त्रियांसोबत बराच वेळ घालविला. ऋतुस्नाता रेणुकेने तेव्हा आपल्या प्रिय स्त्रियांसोबत चित्ररथ गंधर्वाला गंगेच्या आल्हाददायक जलात क्रीडा करताना पाहिले. आपल्या स्त्रियांसोबत जलक्रीडा करणाऱ्या त्या चित्ररथाला पाहून पतिव्रता रेणुकेस आपल्या पतीची जमदग्नीची आठवण झाली आणि लगेच आपल्या मनात आलेले असे विचार आपल्या पतीला कळले असेल याचीही जाणीव झाली व ती त्वरेने आश्रमाकडे निघाली.

इकडे जमदग्नीला हे सर्व कळले होते. आपल्या आश्रमाच्या दारात आलेल्या रेणुकेला पाहून जमदग्नी भयंकर क्रोधित झाले. क्रोधाने ते सारखे तळपत होते. रेणुकेला पाहताच ते क्रोधाग्नीप्रमाणे उद्‌गारले, 'तू घराबाहेर चालती हो, तू स्वैरिणी आहेस, तुझ्यासारख्या दुष्ट स्त्रीला ठार मारून मी आपले हे हात विटाळणार नाही. माझी अग्निहोत्राची शुभ वेळ टळून गेली आहे. देवता, अतिथी यांची पूजा विफल झाली आहे. तू व्याभिचारिणी आहेस, धर्मचारण हेच उद्दिष्ट असलेल्या माझ्यासारख्याची तू पत्नी राहण्यास योग्य नाहीस. माझी पत्नी असताना तू निंद्य कृत्य केलेस.'

क्रोधाग्नीने भडकत असलेल्या आपल्या पतीला विनविण्याचा रेणुकेने आटोकाट प्रयत्न केला. आपल्या पतीव्रतेबद्दल कुठलीही शंका घेऊ नये, असे विनविले. मी निष्कलंक आहे, तरी आपला क्रोधाग्नी शांत होण्याकरिता आपण धर्माने जे योग्य वाटेल ते करावे. तू माझी धर्मपत्नी असून अनाचरण केल्यामुळे तू वधास योग्य आहे, असे सांगून जमदग्नीने अत्यंत क्रोधाने आपल्या वडील मुलास रेणुकेला ठार मारण्याची आज्ञा केली. परंतु मोठा पुत्र वसूने आपल्या आईस ठार मारणारा माझ्यासारखा क्रूरकर्मा कोणीच असणार नाही, असे सांगून रेणुकेचा वध करण्यास असमर्थता दर्शविली. आपला मोठा पुत्र आपली अवज्ञा करतो, हे पाहून जमदग्नीने तात्काळ वसूला शाप देऊन जमिनीवर पाडले. नंतर दुसरा विश्वासू यास रेणुकेला ठार करण्याची आज्ञा केली. तेव्हा विश्वासू म्हमाला, 'आई ही श्रेष्ठ गुरु आहे. ती पित्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. कारण पिता स्वतः तिच्या पोटी पुत्र म्हणून जन्म घेतो म्हणून मी माता रेणूकेचा वध करण्यास असमर्थ आहे.' विश्वासूही आपली आज्ञा पाळत नाही हे पाहून जमदग्नीने त्यासही वज्राने पर्वत चूर्ण करावा, तसे जमिनीवर पाडले. नंतर जमदग्नी आपला तिसरा पुत्र बृहत्कण्व यास रेणूकेची

हत्या करण्याचे आदेश दिले. पण बृहत्कण्व म्हणाला, 'जिच्या पदकमलांचे योगी ध्यान करतात, अशा सर्वोत्तम मातेचा मी मनानेदेखील वध करु शकत नाही.' बृहत्कण्वाचे हे बोलणे ऐकून त्यासही जमदग्नीने धराशाही केले. मग जमदग्नीने चौथा पुत्र वृहद्भानु यास रेणुकेला ठार करण्याची आज्ञा केली. पण त्यानेदेखील, 'बाबा तुमच्या बोलण्याचा धिक्कार असो, क्रोधाने असे बोलू नका. सर्व जगाची जी माता आहे, तिला मी कसा ठार करु ?' असे सांगून रेणूकेचा वध करण्यास नकार दिला. याही मुलाचे असे संभाषण ऐकून जमदग्नीने वृहद्भानुस देखील जमिनीवर पाडले. नंतर मात्र आपला पाचवा पुत्र कैलासात असलेल्या परशुरामास उच्च स्वरात त्रिवार मोठ्याने हाक मारून बोलाविले. पित्याची हांक ऐकून परशुराम तात्काळ जमदग्नीजवल आश्रमी पोहोचला. नम्रपणे हात जोडून पित्यास आज्ञा करण्याची विनंती केली व ज्या कामासाठी मला आपण त्वरेने बोलाविले ते कार्य सांगा. तात्काळ मी आपल्या आदेशाचे पालन करीन. आपल्या मुलाचे असे बोलणे ऐकून जमदग्नीचे अंग रोमांचित झाले. ते परशुरामास म्हणाले, 'ही रेणुका भागीरथी नदीवर स्नानास गेली असता तिने मदनाचे रुप धारण करणाऱ्या गंधर्वाला कामुक भावनेने पाहिले हे मी जाणिले. रेणूका वेळेवर घरी न आल्याने देवता, अतिथी, दीन आणि आर्त यांना तृप्त करण्याचा माझा वेळ व्यर्थ गेला. हे पुत्रश्रेष्ठ परशुरामा हिला तू तात्काळ शस्त्राने ठार कर.'

पित्याने असे म्हटल्याबरोबर परशुरामाने आपल्या परशूने एकवीरा रेणुका मातेचे शीर धडावेगळे केले. आपली आज्ञा शीघ्रतम् पाळल्याबद्दल जमदग्नी परशुरामावर प्रसन्न झाले. प्रसन्न होऊन इच्छित वर मागण्यास सांगितले व मी तुझ्या इच्छा पूर्ण करीन असे सांगितले. तेव्हा परशुराम विनम्रभावाने वडिलास म्हणाला, 'पिताश्री आपण सर्वश्रेष्ठ आहात. आपण माझेवर संतुष्ट झाला आहात, तेव्हा माझ्या मातेला व भस्मराशी होऊन पडलेल्या माझ्या भावंडांना तात्काळ जीवंत करावे व माझ्या आईला आपल्या आज्ञेवरुन माझेकडून तिचा वध झाला, हे तिला स्मरण होऊ नये व त्यामुळे मातृवधाचा दोष माझेवर लागणार नाही.' 'तथास्थु' म्हणून जमदग्नीने आपल्या तपश्चर्येच्या सामर्थ्याने अमृत शिंपडून रेणुकेस व चारही पुत्रांना पुन्हा जीवंत केले. तेव्हा क्रोधमूर्च्छित होऊन आपण जे भयानक कृत्य केले, त्याचा जमदग्नीस पश्चाताप झाला. अतिक्रोधाने आपले आपण सर्व उद्ध्वस्त करुन घेतो, याची जाणीव झाली. तेव्हा आपल्या अंगी असलेल्या त्या भयानक क्रोधाला पश्चाताप बुद्धीने कायमचे त्यागले. क्रोधाने जमदग्नीस त्यागल्यानंतर ते आपल्या प्रिय पत्नीसह मुनीवरोबर व मुलांसह आश्रमात सुखाने राहू लागले.

जगत्ज्ञाती रेणुकेने आपल्या लीलेने जो घटनाक्रम दाखविला, त्यामध्ये रेणुकेने अनेकांना पापमुक्त केले. आपल्या पतीला भयानक क्रोधापासून मुक्त केले. रेणुकेच्या पतिव्रताच्या

तेजाबद्दल जमदग्नीही जाणून होते. पण अती क्रोधाने त्याच्या हृदयात वास केल्यामुळे जमदग्नीच्या सद्‌सद्‌विवेकास त्या क्रोधाने नेहमी बाधा होऊ नये, अशी घटना रेणुकेने घडवून आणली की, त्यायोगे जमदग्नी त्या भयंकर क्रोधाने अविवेकी कृत्य करावे व तद्‌नंतर त्या कृत्याचा हा त्यांना पश्चाताप होऊन विनाशक असलेल्या त्या क्रोधाला ते कायमचे त्यागावेत. त्यासोबतच लज्जागौरी रेणुकेने वरील घटनाक्रमावरुन एक दिव्य संदेशच जगन्मातेने मनुष्यमात्राला दिला. त्यायोगे नैतिक बलाने पृथ्वीवरील स्त्री-पुरुष परिपूर्ण करणारे रेणुकेचे माहात्म्य आहे. कारण परपुरुषाला पाहून पती असताना रेणुकेच्या मनात कामविकार निर्माण होतो. रेणुका साक्षात् लज्जागौरी असल्याने लज्जेचे महत्त्व तिच्या ठायी अधिक होते. कुठलीही दिव्यशक्ती, सर्वगुण, शौर्य, सौंदर्य, तेज, संयम हे ज्या ठिकाणी लज्जा आहे, त्याच ठिकाणी वास करतात आणि म्हणून रेणुका ही लज्जागौरी असल्याने ती सर्वगुणसंपन्न, शौर्यशाली, दिव्य, तेजस्वी, सुलक्षणी होती. आपल्या ठिकाणी परपुरुषाला पाहून कामविकार निर्माण झाल्याने लज्जेच्या अधिष्ठानाला बाधा झाली आणि आपणाकडून असे लज्जाहीन पाप प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष घडले, याची जाणीवही रेणुकेला झाली. रेणुकेच्या लेखी लज्जेचे अत्याधिक महत्त्व असल्याने तितक्याच संयमाने व धीराने पतीभक्तीपरायण रेणुकेने आपल्या पतीने दिलेली मृत्यूदंडाची शिक्षा आपल्या तेजस्वी पुत्राच्या हस्ते स्वीकारली व तेही कुठलीही तक्रार न करता. यावरुन रेणुकेचे परमपवित्र लज्जागौरी हे रुप प्रगट होते. देवीसूक्तांमध्ये वर्णिलेले आहे की,

या देवी सर्वभूतेषू लज्जारुपेण संस्थिता ।
नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नमः ॥

हे देवी सर्व चराचरामध्ये आहे, पण लल्जेमध्ये तू सर्वश्रेष्ठ आहेस म्हणून हे लज्जागौरी तुला त्रिवार वंदन असो.

ज्ञानमाता रेणुकेचे चरित्र माहात्म्य श्रवण करीत असताना रेणुका कृपांकित भक्तांच्या तन-मनामध्ये, विचारांमध्ये व हृदयामध्ये ज्ञानाच्या दिव्य प्रकाशाची ज्योत तेजाळते आणि त्या तेजोमय ज्ञानज्योतीने मनुष्याचे जीवन प्रकाशमय होते. कुठल्याही संकटाची, अपयशाची, अंधःकाराची त्याला भीती राहत नाही.

जमदग्नीने क्रोधाला कायमचे त्यागल्यानंतर ते आपली पत्नी रेणुका व पुत्रासहीत आश्रमामध्ये सुखसमाधानाने राहू लागले. परशुरामाने पुन्हा कैलासात गमन केले. त्रैलोक्यामध्ये जमदग्नी-रेणुका वास करीत असलेल्या आश्रमाची अपरंपार कीर्ती पसरली. कामधेनू, कल्पवृक्ष, सिद्धपादुका, परीस व दिव्य चिंतामणीच्या वास्तव्याने रेणुकेच्या ह्या आश्रमासमोर स्वर्गसुद्धा फिका वाटू लागला.

सहस्त्रार्जुनाचे रेणुका आश्रमी आगमन व जमदग्नीची हत्या

त्यावेळेस स्वर्गात देवांना जिंकणारा पाताळात दैत्यांना व नागांना जिंकणारा आणि पृथ्वीवरील सर्व राजांना जिंकणारा राजा कृतवीर्य सहस्त्रार्जुन हा दिग्विजयी सम्राट महिष्मती या नगरात राज्य करु लागला. सहस्त्रार्जुन हा परम दत्तभक्त होता. दत्तात्रयांच्या अलौकिक कृपाप्रसादाचा त्याला लाभ झालेला होता. त्याच्या वडिलांचे नाव हैह्य व आईचे नाव राकावती होते. राकावती सायंकाळी आपल्या पतीसोबत समागमात रममाण असताना मधू नावाच्या राक्षसाने विष्णूसोबतचे पूर्वीचे वैर आठवून राकावतीच्या पोटात प्रवेश करुन जन्म घेतला. कृतवीर्यापासून तो असूर हस्तविहीन जन्मला. करविहीन तो नंतर सर्वगुणसंपन्न दत्तात्रय आश्रमात गेला व दत्तात्रयांची आराधना करुन दत्तकृपेने त्याने हजार हात मिळविले व मला कोणत्याही क्षत्ररथ राजाकडून मृत्यू न येता विद्वत्ताप्रचूर, तेजःपुंज, अलौकिक, तपस्वीकडूनच मृत्यू यावा असा वरही मागून घेतला. अशा या दत्तात्रय कृपांकित सहस्त्रार्जुनाने दशवदन रावणासही युद्धात हरविले होते. त्याच्या एवढा त्रिभूवनातही बलवान शूर योद्धा कुणीही नव्हता.

त्याचवेळेस जमदग्नी व रेणुकेच्या आश्रमाचीही कीर्ती पसरली होती. तिन्ही लोकांत प्रसिद्ध असलेल्या महिष्मती नगरीत एकदा ब्रह्मपुत्र नारद आले व त्यांनी जमदग्नी व रेणुकेच्या दिव्य आश्रमाची महती सहस्त्रर्जुनाजवळ कथन केली. नारदाकडून जमदग्नीच्या आश्रमाची संपूर्ण महती ऐकून सहस्त्रार्जुन नोकर-चाकर, बंधू व सैन्य घेऊन जमदग्नीचा तो सुंदर आश्रम पाहण्यासाठी त्वरेने निघाला. शिकार करीत करीत तो जमदग्नीच्या आश्रमाजवळ आला असता महिष्मती नगरीचा राजा आपल्या आश्रमात आल्याचे पाहून जमदग्नीस अत्यंत आनंद झाला. आपला राजा आणि अतिथी स्वरुपात आलेल्या सहस्त्रार्जुन व त्याच्या सर्व सैन्याचा जमदग्नीने मनोभावे सत्कार केला. त्रैलोक्याहून अधिक पुण्यवान आश्रम पाहून सहस्त्रार्जुनास अत्यंत आश्चर्य वाटले. द्विजशाला आणि अग्निकुंडांनी सुशोभितत असलेला तो आश्रम पाहून राजाचे नेत्र आश्चर्याने विस्फारीत झाले. शिकारीकरीता फिरणाऱ्या व जमदग्नी आश्रमाच्या ख्यातीने प्रभावित झालेल्या राजाने आश्रमात विश्रामस्थान केले. जमदग्नीने रेणुकेस सहस्त्रार्जुन राजा आपल्या आश्रमात आल्याचे सांगून, तो जोपर्यंत आपल्या आश्रमात आहे, तोपर्यंत यथायोग्य त्याचे व त्याच्या सैन्याचे आदरातिथ्य करावे असे सांगितले. तेव्हा रेणुका म्हणाली, 'आपल्या आश्रमात आलेला अतिथी भोजनाविन जाऊ नये. त्यांचे आदरातिथ्य करुन सहस्त्रार्जुन व त्याच्या संपूर्ण सैन्यास आपण सविनय भोजनास पाचारण करावे.' रेणूकेस भोजनाची संपूर्ण यथोचित व्यवस्था करण्याचे सांगून जमदग्नी सहस्त्रार्जुनास भोजनाचे निमंत्रण देण्यास राजाच्या विश्रांतीस्थानाकडे गेले. जेव्हा जमदग्नीने राजास व त्यांच्या संपूर्ण सैन्यास

भोजनाचे सादर आमंत्रण दिले. तेव्हा सहस्त्रार्जुनास थोडेसे आश्चर्य वाटले. ह्या आश्रमामध्ये एवढे अन्न नाही. पक्वान्नांची व्यवस्थाही नाही. त्यामुळे ह्या तापसाच्या घरी कंद-मूल-फळांसेस भोजन असणार असे त्याला वाटू लागले.

जेव्हा गंगेतून स्नान करुन सहस्त्रार्जुन व त्याचे सैन्य व रोचक भोजनाकरीता आश्रमात आले. त्याआधी रेणूकेने कामधेनूची आर्जना केली व तिच्या कृपेने राजा व त्याच्या सैन्यासाठी सुंदर पक्वान्ने, पेये, स्वादिष्ट मिष्टान्ने तयार केली. तदनंतर जेव्हा ते उत्तम पक्वान्ने सेवन करीत असताना सहस्त्रार्जुनाने रेणुकेस व कामधेनू मोठ्या आदराने पाहिले व त्याला पराकोटीचे आश्चर्य वाटले. आश्रमामध्ये स्वादिष्ट पक्वान्ने करण्याचे कुठलेच साधन नसताना जमदग्नी व रेणुकेने आपणास व आपल्या सैन्यास एवढे विपूल प्रमाणात पक्वान्न व पेये कसे उपलब्ध करुन दिले, असा प्रश्न सहस्त्रार्जुनास पडला. त्याने आपल्या गुप्तचरास ही माहिती मिळविण्यास सांगितले. गुप्तचरांकडून त्याला सर्व माहिती मिळाली की, 'येथे कुठलेही अन्न नाही, अन्न शिजविण्याचे साधन नाही, सुंदर पेये, मिष्ठान्ने, गाई ह्या काहीही नाही. पण येथे एक दिव्य कामधेनू आहे व ह्या कामधेनूच्या कृपेनेच येथे सर्व मिष्ठान्ने, पक्वान्न, पेय क्षणार्धात निर्माण होतात व आश्रमातील सर्व ऋषी, मुनींसह येणाऱ्या अतिथीस तिच्या सामर्थ्याने निर्माण होणारे स्वादिष्ट भोजन पुरविले जाते.' कामधेनूची अशी महती ऐकून सहस्त्रार्जुन आश्चर्यचकीत झाला व त्याची नियती फिरली. तो कामधेनूची अपेक्षा करु लागला. ह्या लहानशा आश्रमामध्ये अशी दिव्य कामधेनू ठेवण्यापेक्षा ही कामधेनू प्राप्त करुन महिष्मती नगरीत नेण्याचा निश्चय त्याच्या मनात आला. उत्कृष्ट भोजनाने आणि आदरातिथ्याने तृप्त झालेल्या राजाने जमदग्नी व रेणूकेजवळ कामधेनू देण्याची विनंती केली. त्याच्या बदल्यात भरपूर धन, स्वर्णकांतीसम गाई, सोबतच अर्धे राज्यही देण्याचा प्रस्ताव ठेवला. तेव्हा जमदग्नी आणि रेणूकेने ही कामधेनू आम्हास इंद्राकडून स्वर्गातून मिळालेली असून आश्रमाच्या सेवेकरिताच तिचा उपयोग होवू शकतो व आपणासारखा कुणी अतिथी आल्यास त्याच्या आदरातिथ्यासाठी आम्हा उभयताना कामधेनूची आवश्यकता आहे व आम्हास ती भेटस्वरुप आल्याने आम्ही ती कुणासही देण्यास असमर्थ आहोत, असे सांगून कामधेनू देण्यास विनम्र नकार दिला. आपल्यासारख्या त्रिभूवनाचा स्वामी असलेल्या राजास हे ऋषी व त्यांची पत्नी नकार देतात, हे ऐकून सहस्त्रार्जुनास भयंकर राग आला. ऋषीने दिलेले वस्त्रालंकार सहस्त्रार्जुनाने स्वीकारले नाही. त्यामुळे रेणुकेस व जमदग्नीस फार दुःख झाले. पुन्हा राजाची विनवणी करीत जमदग्नी त्यास म्हणाले, 'हे राजा ! हे आमचे आदरातिथ्य स्वीकार कर. मी केलेला सन्मान तु आनंदाने ग्रहण कर.' पण कामधेनूची अभिलाषा मनात तीव्र झालेल्या राजाने पुन्हा जमदग्नी व रेणुकेस वेगवेगळी आमिषे दाखविली. पण हे उभयता

स्वीकारण्यास तयार नसल्याचे पाहून सहस्त्रार्जुन म्हणाला, 'आपण ही कामधेनू मला सन्मानपूर्वक नाही दिली तर मी ह्या कामधेनूस जबरदस्तीने येथून घेऊन जाईन.' तेव्हा कामधेनू जमदग्नीस व उपस्थित मुनीस म्हणाली, 'मी तुमची आहे. तुमच्या सेवेकरिता आहे. मी शत्रू असलेल्या सहस्त्रार्जुनाच्या घरी जाणार नाही. सहस्त्रार्जुन मला बलाने नेऊ शकणार नाही.'

जेव्हा सहस्त्रार्जुन कामधेनूस बलाने नेण्याचा प्रयत्न करु लागला तेव्हा ती जमदग्नीजवळ गेली व म्हणाली, 'तुम्ही आश्रमाचे स्वामी आहात. मी तुमच्या सेवेकरिता आहे. आपण महातपस्वी आहात, तेव्हा ह्या दुष्ट सहस्त्रार्जुनापासून माझे संरक्षण करावे.' कामधेनूची ही विनवणी ऐकून जमदग्नी मोठ्या दुःखाने म्हणाले, 'मी क्रोधविरहीत झालेलो आहे. हे माते ! त्यामुळे मी क्रोधित होणार नाही. क्रोधाला मी कायमचे त्यागले आहे. मी तुझे पोषण करण्यास जरी समर्थ असलो तरी रक्षण करण्यास समर्थ नाही. तुला बळाने घेऊन जात आहेत, यामध्ये मी विनवणीशिवाय काहीही करु शकत नाही.' हे सर्व ऐकताच सहस्त्रार्जुनाने बळाने कामधेनूस घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा कामधेनूने हुंकार केल्याबरोबर निरनिराळी आयुधे घेतलेली प्रलयंकाराच्या अग्निप्रमाणे अनेक सैन्य निर्माण झाले. धेनूच्या मुखातून किरात, डोळ्यातून म्लच्छ जाती, कानातून बर्बर, मूत्ररंध्रातून द्रविड, गोमय द्वारातून पुण्ड व रोमरंध्रातून उग्र स्वरुपाचे अगणित शस्त्रधारी सैन्य निघाले. कामधेनूच्या व सहस्त्रार्जुनाच्या सैन्यात घनघोर युद्ध झाले. ह्यामध्ये सहस्त्रार्जुनाचे अमात्य ठार झाले. परंतु दत्तात्रयांच्या कृपेने सहस्त्रार्जुनाचा विष्णूस्वरुपाशिवाय कुणीही वध करु शकत नसल्यामुळे त्याने सर्व सैन्याला ठार केले. कामधेनूस पकडण्याकरिता जेव्हा सहस्त्रार्जुन सरसावला, तेव्हा कामधेनू जमदग्नीच्या आश्रयास गेली. हे पाहून पुन्हा सहस्त्रार्जुन जमदग्नीस म्हणाला, 'मुनिश्वर, जर तुला जीवंत राहण्याची इच्छा असेल तर ही कामधेनू तात्काळ मला दे.' तेव्हा जमदग्नी पुन्हा विनवणी करीत सहस्त्रार्जुनास म्हणाले, 'आम्ही तुझे एवढे आदरातिथ्य केले. आमचे यथायोग्य आदरातिथ्य स्वीकारण्याचे सोडून एक बलशाली राजा असताना एका तपस्वी ऋषीकडून तु अशी का अपेक्षा करावी. मी कामधेनू देण्यास असमर्थ आहे. तो माझा अधिकारही नाही आणि ही कामधेनू तुझ्यासोबत यायलाही नाकारते अशावेळेस तुझ्या मनात जो मोह निर्माण झालेला आहे त्यास त्यागून तुझी ही दुष्ट अभिलाषा सोडून दे.' मुनीने असे म्हटल्यावर क्रोधिष्ट होवून सहस्त्रार्जुनाने तीक्ष्ण हत्याराने जमदग्नीवर वार केला.

आपल्या पतीला सहस्त्रार्जुनाने तीक्ष्ण हत्याराने मारत आहे हे पाहून रेणुका आक्रोश करु लागली. आपल्या पतीला वाचविण्यासाठी ही पतिव्रता आपल्या पतीवर आडवी झाली. तेव्हा सहस्त्रार्जुनानेही एकवीस वेळा रेणुकेवरही वार केले व जमदग्नीस असंख्य वार

करून ठार केले. तेव्हा आर्त स्वरात ती सहस्रार्जुनास म्हणाली, 'कामधेनूची अभिलाषा करून तू हे भयंकर कृत्य केले केलेस व महातपस्वी अग्नलेल्या माझ्या पतीची हत्या केलीस. तुझ्यासारखा पराघ खाऊन त्याचे पाप फोडण्याग कृतघ्न दुसरा कोणीही नसेल व आपला पुत्र परशुरामास अतितीव्र स्वरात शाप मारली. परशुरामाच्या भयाने सहस्रार्जुन असे दुष्कृत्य करून तेथून निघून गेला. आपल्या मुनीचा वध व रेणुकेवर एकवीस वार झालेले पाहून दुःखित होऊन आक्रंदन करीत तत्क्षणी कामधेनू स्वर्गात परत गेली.

परशुरामाचे जमदग्नी पार्थिव व रेणुकेसह कोरी भूमीकडे प्रयाण आणि दत्तात्रय दर्शन

आपल्या आईचा तीव्र आवाज ऐकून कैलासाहून तात्काळ परशुराम आपल्या आश्रमी आला. आपल्या वडिलांना ठार झालेला पाहून व आई रेणुका एकवीस वाराने घायाळ झालेली पाहून ह्या महावीर पुत्रास अती दुःख झाले. हे दृश्य पाहताच परशुराम हे दुष्टकृत्य करणाऱ्यास ठार मारण्यासाठी तळमळू लागला. जेव्हा घायाळ झालेल्या आपल्या आईकडून घडलेला सर्व वृत्तांत समजला, तेव्हा मात्र सहस्त्रार्जुनाप्रती त्याच्या मनात भयंकर क्रोध निर्माण झाला व त्याने आईसमोर प्रतिज्ञा केली की, 'हे माते ! माझ्या तपस्वी, क्रोधहीन, शांत पित्यास ज्याने ठार केले व जगत्वंद्य करुणामयी माझ्या आईवर ज्याने एकवीस वार केले त्या सहस्त्रार्जुनाचे एक हजार हात आपल्या बाणाने तोडून टाकीन आणि त्या दुष्टाचे शीर आपल्या परशुने धडावेगळे करुन ही पृथ्वी एकवीस वेळा निःक्षत्रिय करीन.' आपल्या शूर पुत्राची ही प्रतिज्ञा ऐकून रेणुकेने परशुरामास शुभाशीर्वाद दिले. 'पण आधी आपल्या पित्याचे भक्तीभावाने संस्कार कर मगच ती प्रतिज्ञा सफल कर' असे सांगितले. 'पित्याला तुलेत (कावडीत) एका बाजूने ठेवून आणि दुसऱ्या बाजूने मला ठेवून सतीची वाणी ऐकू येईपर्यंत मला घेऊन जा. पुत्र तेथे सर्वशास्त्रनिपुण, ओंकारस्वरुप आचार्य दत्तात्रय भेटतील. त्यांच्या पौरोहित्यात भक्तीने आम्हा दोघांची प्रतिष्ठा कर. हे करणे तुझ्या प्रतिज्ञेच्या पूर्ततेसाठी अगत्याचे आहे. कारण सहस्त्रार्जुन हा परम दत्तभक्त आहे व दत्तात्रयास प्रसन्न करणे हे तुझे कर्तव्य आहे.'

दत्त पुराणात ही असा उल्लेख आलेला आहे की, आईची आज्ञा शिरसावंद्य मानून परशुराम एक कावड तयार करुन तिच्या एका पारड्यात आपल्या पित्याच्या पार्थिवास व दुसऱ्या पारड्यात आपल्या मातेस घेऊन चालू लागला. तेव्हा रेणुका आपल्या पुत्रास म्हणाली, 'जेव्हा थांब अशी आकाशवाणी होईल तेथेच तुला दत्तात्रय प्रभू भेटतील. आमचा अग्निसंस्कार तेथेच कर.' मातेची आज्ञा मानून तो चालू लागला. माता-पित्याचा संस्कार करण्याकरीता कावड खांद्यावर घेऊन कान्यकुब्ज प्रदेशातून विविध स्थान पाहत-पाहत तसेच सर्वच तीर्थक्षेत्र, पवित्र अरण्ये, विविध पुण्यपर्वत, नदीतीर्थे यांचे दर्शन करीत

परशुराम कावड घेऊन सह्याद्री पर्वतावरील आमलकी ग्राम नावाच्या मुनींनी शोभणाऱ्या पवित्र ठिकाणी आला. हेच अमलकी ग्राम म्हणजे परमपावन श्रीक्षेत्र मातापूर म्हणजे आजचे 'माहूर'. त्या ग्रामात परशुरामास एक सुंदर आश्रम दिसला. त्या आश्रमात कोणतीही बाधा नव्हती. तो परम पवित्र होता व तेथेच आकाशवाणी झाली. तेव्हा रेणूकेने परशुरामास सांगितले, 'पुत्रा ! तु श्रीदत्तात्रयांकडे येऊन पोहोचला आहेस. येथेच आपल्या पित्याचा अग्निसंस्कार कर व तुझी प्रतिज्ञाही सफल होईल.' जेव्हा कावड तेथे ठेवून परशुराम दत्त आश्रमात गेला तेव्हा दिगंबर अशा श्रीदत्तात्रयांचे दर्शन झाले. दत्तात्रयांस पाहून परशुराम म्हणाला, 'भक्तवत्सला सर्वज्ञा, मी आज माता-पित्यांचा संस्कार करण्याच्या उद्देशाने कोरी भूमी असलेल्या ह्या पवित्रस्थळी आलेलो आहे. कृपया मला सर्व विधी सांगून कृपावंत करावे.' परशुरामाची ही विनंती ऐकून श्रीदत्तात्रय म्हणाले, 'मी विधीही जाणत नाही व निषेधही जाणत नाही. मन मानेल तसे आचरण करुन मी येथे पिशाच्चवत् राहिलो आहे. मी अनाचार, धर्म वा अधर्म यापैकी काहीही जाणत नाही असे असताना व तु सर्व पाहत असताना आचारविचाराची वार्ता माझ्याकडे कुठून असणार बरे.' तेव्हा रेणूका म्हणाली, 'श्रीदत्तात्रया अशा औपचारिक भाषणाने आपण माझ्या पुत्रास भुलवू नये.' रेणुकेचे हे शब्द ऐकताच श्रीदत्तात्रयाने जगन्मातेस विनम्र अभिवादन केले. दत्तात्रयांना जेव्हा जमदग्नी व रेणुकेची ही दुःख वार्ता कळली तेव्हा त्यांनी 'असे विद्वत्जनांना, निष्पाप जनांना जे घात करतील, ते उन्मत्त झालेले शस्त्रधारी राजे नाश पावोत' अशी वाणी केली.

नंतर दत्तात्रयांच्या आज्ञेनुसार परशुरामाने आपल्या दिव्य बाणाने सर्व पर्वत फोडून सर्व तीर्थे एकत्र आणली. त्या सर्व तीर्थांनी आपल्या माता-पित्यास विधियुक्त स्नान घातले. नंतर दत्तात्रयाने क्रव्याद नामक अग्नी प्रदीप्त केला व आपल्या अहिताग्नी पतीसह सुमंगल रेणुकेने आनंदाने अग्निप्रवेश केला. सती स्पर्शाने ती भूमी मूलदरी म्हणून पावन झाली. नंतर और्ध्वदेहिक सर्व कर्मे दत्तात्रयाने परशुरामाकडून करुन घेतले. विधिपूर्वक अज्जलीदान व पिण्डनिर्वापखादी क्रीयाकर्मे करुन घेतली ते 'मातृतीर्थ' म्हणून त्रैलोक्यात प्रसिद्ध झाले. संस्कार पूर्ण झाल्यावर दत्तात्रयांनी परशुरामास सांगितले, 'तुझे माता-पिता मरून स्वर्गात गेले, ही अज्ञपणाची समजूत आहे. ते मेलेले नाहीत आणि गेलेही नाहीत. ते पहा ते येथे स्वच्छंदपणे विहार करीत आहेत व येथेच राहतील.' तेव्हा परशुरामाने पाहिले की, आपले माता-पिता तेजाने दशदिशा प्रकाशित करीत आनंदाने विराजमान झाले. तद्नंतर अंतर्धान पावले. तेव्हा परशुरामाने मातृविरहाने आपल्या मातेला आवाहन केले. तात्काळ आपल्या पुत्राची हाक ऐकून त्रैलोक्यास उद्धारण्यासाठी प्रत्यक्ष रेणुका पृथ्वीचा भेद करुन वर आली. आजही हा तांदळास्वरुपी तेजःपुंज मुखकमल अनंत भक्तांना

माहूरगडावर कृतकृतार्थ करीत आहे व मनुष्यही केवळ त्या मुखकमलाच्या तेजःपुंज दर्शनाने कृपांकित होत आहे. तरोच नंतर परशुरामाने प्रणितेत स्नान करुन घनघोर युद्धामध्ये सहस्त्रार्जुनाचा वध करुन ही पृथ्वी एकवीस वेळा निःक्षत्रिय केली व त्याच्या रक्ताने पाच सरोवरे भरुन टाकली. तीच पुढे स्यमन्तक पंचतीर्थ म्हणून कुरुक्षेत्रात प्रसिद्ध झाली व रेणुकेस सहस्त्रार्जुनाच्या रक्ताने स्नान घालून परशुरामाने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली आणि दत्तात्रय आश्रमाजवळील भानुतीर्थाजवळ परशुरामाने पुण्यजलाने सर्व शस्त्रे शुचिर्भूत केली. तेव्हापासून सदैव जगन्माता रेणुकेचा माहूरगडावर नित्य वास आहे. मुनिश्वर जमदग्नी सर्व देवांसह प्रकट होऊन प्रत्यक्ष भगवान ईश्वर कोटी तीर्थासह तेथे वास करु लागले व परशुराम गणेशरुपात रेणुकेजवळ राहिला. अशा रीतीने सह्यांचलावर प्रत्यक्ष रुपाने रेणुका वास करु लागली. महाशैल मेरु, हिमवान, मलय तसेच श्रीशैल हे पर्वत रेणुकेच्या ह्या श्रेष्ठ आश्रमात राहिले. सर्वच तीर्थे रेणुकेच्या कृपेने सह्याद्री पर्वतावर राहू लागली व दुष्ट सहस्त्रार्जुनाचा संहार केल्यावर परशुराम व नारदाची भेट झाली. त्याक्षणी रेणूकेने सहस्त्रार्जुनाचे शरीर बोलावले. नर्मदा नदीतून रेणुका आश्रमामध्ये आलेले ते शरीर वेगाने एकवीरा रेणुकेच्या आसनाखाली शिरले व आत्मारहित ते शरीर तेथेच थांवले. देवीच्या मूळ पीठासनात ज्याची प्रभा फाकली आहे अशा रत्नांनी विभूषित असे सहस्त्रार्जुनाचे कलेवर शोभू लागले.

परम साक्षात्कारी श्रीक्षेत्र माहुरगड

मनुष्यमात्रास रेणुकेच्या उपासनेने इहलोकी भोग व अंती मोक्ष प्राप्त होतो. आजही आमलकी ग्रामात म्हणजे मातापुरात (माहूरगडावर) निरंतर वास करणाऱ्या श्रीदत्तात्रयांच्या आश्रमाशेजारीच रेणुका प्रकटली तो पवित्र आश्रम आहे. ज्या ठिकाणी अग्निप्रवेशापूर्वी स्नान केले व तद्नंतर विविध अज्जालीदान, पिण्डादीकर्म केले ते मातृतीर्थ अत्यंत पुण्यप्रद आहे. ह्या माहूरगडावर एका बाजूस अत्रि-अनसूयाचा आश्रम आहे. दुसऱ्या बाजूस रेणुका मातेचा आश्रम आहे व दोन्ही आश्रमांच्या मध्ये भगवान श्रीदत्तात्रयांचा आश्रम आहे. तसेच जवळच देवी लक्ष्मीची अंगभूत अशी कृष्ण आमलकी (काळीआवळी) आहे. ही कृष्णामलकी म्हणजे समुद्र मंथनाचे वेळी क्षीरसागरातून कृष्णामलकी उत्पन्न झाली व ती भगवंतांनी माहूरगडावर आणून लावली असे पुराणात सांगितले आहे.

ज्या ठिकाणी जमदग्नी व रेणुकेचा अग्निसंस्कार झाला ते स्थान मुदरी म्हणून प्रसिद्ध आहे. पूर्वी हरिश्चंद्र पिता त्रिशंकू नावाच्या राजाने पुत्र होण्याच्या इच्छेने मूलदरीत पुत्रेष्ठी नावाचा यज्ञ केला. रेणुकेच्या कृपेने त्या सत्संगर त्रिशंकू लाजास हरिश्चंद्र नावाचा फार प्रसिद्ध पुत्र झाला असे शास्त्रात वर्णिले आहे. मुक्ती आणि भुक्तीचे फळ देणाऱ्या स्थानास 'मूळपीठ' असे म्हणतात आणि ब्रह्मांडाची आदिशक्ती माहूरगडावर मूळ करुन वास करु

लागली ह्या कारणानेही रेणूकेच्या माहुरगडास 'मूळपीठ' असेही म्हणतात. स्वर्गातून देव माहुरगडाला येताना पाहून कैलासासहित स्वयं मेरु तेथे आला. तो सुवर्णपर्वत मेरु, देवांनी प्रार्थना केल्यावरुन सर्वतीर्थांसह रेणुकेच्या स्थानी सह्यांचलाच्या अग्रावर तेथे राहिला. मध्यम असे भुक्तिमुक्ती देणारे विष्णूकुट असून तेथेच भुक्ति-मुक्ती देणारी रेणुका राहते. मेरुच्यावर उत्तर शिखराला 'ब्रह्मस्थान' म्हणतात. तेथे देवदेवेश्वर संस्थान आहे. मध्यपूर्व शिखराला 'रुद्रस्थान' म्हणतात. त्या ठिकाणी श्रीदत्त शिखर संस्थान आहे.

आपल्यामध्ये रेणुकेचे माहात्म्य श्रवण करीत असताना आत्मचैतन्य संचारते. दत्तपुराणात असेही सांगितले आहे की, जेव्हा प्रत्यक्ष ब्रह्मदेवास उपनिषदे आणि वेदांचे विस्मरण झाले तेव्हा ब्रह्मदेव सर्वज्ञानी श्रीदत्तात्रयांकडे गेले व 'मला उपनिषद व वेदांचे पुन्हा स्मरण व्हावे' म्हणून विनविले. तेव्हा प्रत्यक्ष श्रीदत्तात्रयानेसुद्धा ब्रह्मदेवास रेणुकेची आराधना करण्यास सांगितले व रेणुका मातेच्या आराधनेने ब्रह्मदेवास पुन्हा उपनिषद व वेदाचे स्मरण झाले. असे रेणुकामातेचे अनेक साक्षात्कार विविध शास्त्र-पुराणांमध्ये वर्णिलेले आहे. जगन्माता रेणुकेने आपल्या कृपेने दत्तभक्त सहस्त्रार्जुनाचीही मृत्यूची इच्छा आपल्या पुत्र परशुरामाकरवी पूर्ण केली व त्याच्या शरीराला आपल्या दिव्य आसनाखाली सामावून पापमुक्त केले. सर्व देवांचा उद्धार करणारी अशी ही परमपावन आदिशक्ती रेणुका माहूर येथे वास करीत आहे.

ही माहुरनगरी प्रत्येक युगात वेगवेगळ्या नावाने प्रसिद्ध होती. कृतयुगात त्यास आमलीग्राम, त्रेतायुगात सिद्धपूर, द्वापारयुगात देवनगर आणि कलियुगात मातापूर म्हणजेच माहूर. याच माहूरविषयी एक प्राचीन दृष्टांतही प्रसिद्ध आहे. सतीने दक्ष यज्ञात जेव्हा देहत्याग केला, हे ऐकल्यावर प्रत्यक्ष शिव तेथे पोहोचले. सतीने दक्ष यज्ञात देह त्यागल्याने शिव अत्यंत भावविभोर होऊन व्याकूळ झाले. अशा अवस्थेमध्ये सतीचे कलेवर घेऊन ते समस्त आकाशात दुःखावेगाने संचार करु लागले. त्यामुळे विश्वाचे सर्वच व्यवहार बंद पडू लागली व सर्व अघटित होऊ लागले. तेव्हा सर्व देव विष्णुला शरण गेले व हे संकट निवारण्यासाठी विनंती गेली. तेव्हा भगवान विष्णुने गुप्तरुपाने आपल्या सुदर्शन चक्राच्या सहाय्याने सतीच्या देहाचा एक-एक भाग कापला. अशा तऱ्हेने सतीच्या देहाचे भाग जेथे जेथे पडले तेथे-तेथे शक्तीची पवित्र स्थाने निर्माण झाली. जगताचे धारण-पोषण करणारे जगन्मातेचे वक्ष माहुर येथे पडले म्हणूनच माहुरला मातापूर असे म्हणतात.

माहुरला मातापूर म्हणताना आणखी एक घटना कारणीभूत आहे, ती अशी की ब्रह्मा, विष्णू व महेशाने महासती अनसूयेच्या सती तेजाला प्रसन्न होऊन माहूर येथील अत्री-अनसूया आश्रमामध्ये अनसूयेची बालके झाली. अशा तऱ्हेने महासती अनसूया तिन्ही देवांची माता झाली म्हणूनही मातापूर म्हणून त्याचे माहात्म्य सर्वात ज्येष्ठ आणि श्रेष्ठ

आहे. कुठल्याही शास्त्र, पुराणात दाखला देऊन रेणुका मातेचे माहात्म्य, चरित्रस्मरण केल्यास मातेच्या अलौकिक तेजाचे गुणवर्णन आपणास ऐकावयास मिळते. जगत्नियंती आदिशक्तीचा संपूर्ण पृथ्वीवर पूर्णरुपाने वास सह्याद्री पर्वतावरील मातापूर म्हणजेच माहूरगडावर आहे. त्यायोगे सर्व देवी-देवता, ऋषी-मुनी, गंधर्व, किन्नर, तपस्वी आणि प्रत्यक्ष ब्रह्मा, विष्णू, महेश यांचेसह जगत्वंद्य श्रीदत्तात्रय यांचा नित्य वास माहूरगडावर आहे. ह्या भूमीला कोरी भूमिही म्हणतात. म्हणजे अत्यंत शुचिर्भूत, कशाचीही बाधा न झालेली अशी रेणूका नगरी पुण्यनगरी आहे. देवांचेही हे माहेर आहे. सर्वच देवी-देवता येथे वास करुन राहिल्याने द्वापारयुगात देवनगर म्हणून हे प्रसिद्ध होते व आजही आहे. त्याआधी त्रेतायुगात त्रैलोक्यालाही अशक्य असणाऱ्या अनंत गोष्टी आदिशक्तीच्या दिव्य कृपेने सिद्ध झाल्यामुळे त्रेतायुगात ह्या क्षेत्रास सिद्धपुर म्हणून नावलौकिक प्राप्त झाला. त्याही आधी कृतयुगात प्रत्यक्ष भगवंतांनी अमलकी क्षीरगासराच्या मंथनातून निघालेली कृष्णामलकी म्हणजे (काळी आवळी) येथे लावली म्हणून आमली ग्रामही म्हणून पुण्यपावन होते व आज कलियुगातही आदिशक्तीचे हे पीठ मातापूर माहूर म्हणून भक्तांना कृपावंत करीत आहे.

पृथ्वीच्या पाठीवर एवढे दिव्य आणि परमपावन स्थान कोठेच नाही. सर्व तीर्थाहून अत्याधिक साक्षात्कारी, जागृत स्थान म्हणूनही आपल्या विश्वव्यापी तेजाने झळकत आहे. कारण ब्रह्मांडाची आद्यशक्ती, विश्वमोहिनी, विश्वव्यापिनी, देवमाता, सकलकल्याणी, मुक्तीदायिनी माहूरगडावर आजही वास करुन आहे आणि आपल्या निस्सीम भक्तास साक्षात्कार दाखवून दर्शनाचा लाभ देत आहे. अशा आदिशक्तीच्या अनेक युगात झालेल्या शौर्य, पराक्रमाच्या अद्भुत दिव्य कथा केवळ श्रवणीयच नाही तर आदिशक्तीच्या विविध रुप, स्वरुप, प्रकृती, शौर्याच्या निस्सीम श्रद्धेने वाचनाने, पठणाने तिच्या अलौकिक शक्तीचा लाभ भक्तास होतो. सप्तशती ह्या मूळ ग्रंथामध्ये मार्कण्डेय ऋषींनी लिहिलेल्या देवीच्या पराक्रम, शौर्याच्या कथा आणि तिच्या दिव्य गुणाचे स्मरण हे अप्रतिम, पापनाशक आहेत. ह्याच आदिशक्तीने शुंभ-निशुंभ, महिषासूर, मधू-कैटभ, चण्ड-मुण्ड ह्या महाबलाढ्य, त्रिभुवनास कंपित करणाऱ्या राक्षसांनाही ठार मारले. जनमानसात ह्या देवीची मंगलदायिनी म्हणून प्रतिमा आहे. त्याच गुण स्वरुपाची ती आहे. परंतु तिचे अवतार कार्य अनेक प्रकारांनी, स्वरुपांनी आहे.